P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra – 411033

**प्रेसनोट** **दिनांक – २३/१०/२०२४**

**दि. २२/१०/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

पोस्टे व गु रजि.नं. :- महाळुंगे एमआयडीसी ७१२/२०२४ भा.न्या.सं.कलम १८९(२), १२६(२),३५२, ३५१(२)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२१/१०/२०२४ रोजी १६.१५ वा ते १७.३० वा. चे सुमा.मौजे महाळुंगे गावचे हद्दीत, जे बी एम ॲटो लिमीटेड कंपनीच`गेट समोर ता.खेड जि.पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.२२/१०/२०२४ रोजी १५.४९ वा.

फिर्यादी :- अभिजीत लक्ष्मण काचोळे वय ३३ वर्ष, धंदा - क्रेन सर्विस, सध्या रा. निगडी प्राधिकरण, अभिलाषा सेक्टर नं. २६ प्लॉटनं. सी ३, पी सी एम सी ऑफीसर्स हौउसिंग सोसायटी,निगडी

आरोपी :- १) अभिषेक जावळे रा. महाळुंगे ता. खेड जि.पुणे
२) अभिषेक जावळे याचे पाच साथिदार (नाव पत्ता माहीत नाही)
**आरोपी निष्पन्न**
२) चैतन्य कमलाकर पाटील वय २२ वर्ष, ३) प्रथमेश चंद्रकांत माळी वय २३ वर्ष, ४) सतिष रामदास गोरे वय २३ वर्ष,
५) मोहन भरत गरुड वय २६ वर्ष,
६) संकेत शरद न-हे वय २२ वर्ष, सर्व रा. महाळुंगे ता.खेड जि.पुणे
**आरोपी अटक आहेत**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी कडीलचालक राजकुमार यादव हा त्याचे ताब्यातील १२ टनी हायड्रा क्रेन नं.एम.एच. १४/ए.झेड.९१७६ ही घेवुनगेला असता त्या ठिकाणी जावळे क्रेन सर्विसचा आरोपी क्र १ यानेत्याचे बरोबर आणखी पाच साथिदार घेवुन येवुन गर्दी जमाव जमवुन फिर्यादीचे क्रेन कंपनीचे गेटचे आत मध्ये जाण्यास प्रतिबंध करुन अडवणुक केली त्यावेळी फिर्यादीने आरोपीस तुम्ही आमची क्रेन का अडविली आहे, असे विचारले असता आरोपी क्र १ ने फिर्यादीला तुमची क्रेन कंपनीत घालायची नाही ही माझी कंपनी आहे. इथे आमची क्रेनचालणार व तुम्ही या ठिकाणीकसा व्यवसाय करता ते पाहतो असे म्हणुन शिवीगाळ दमदाटी करुन निघुन गेले

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि मुल्ला ८९७५७००४३४

०२.

पोस्टे व गु रजि.नं. :- देहुरोड ४६९/२०२४ भा.न्या.सं.कलम १२५,२८८

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२१/१०/२०२४ रोजी १५/०० वा. चे सुमारास सिताई रोशन निवास, शॉप नं.१,२ बलदोटानगर, मामुर्डी, पुणे येथील न्यु अगरवाल ट्रेडर्स नावाच्या दुकानात

गुन्हा दाखल :- दि.२२/१०/२०२४ रोजी ०१.१७ वा

फिर्यादी :- बाळासाहेब वसंत विधाते, पोलीस हवालदार १५७१, देहुरोड पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

आरोपी :- महेश प्रेमप्रकाश अगरवाल, वय ४२ वर्षे, रा. मित्र प्रेम बिल्डींग, एचडीएफसी बँकेमागे, देहूरोड, पुणे
**बी.एन.एस.एस. कलम ३५(३)प्रमाणे नोटीस**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपीने त्याचे दुकानामध्ये ७९,१६६/- रु किं चे विनापरवाना ज्वलनशील पदार्थ (फटाके) मांडुन त्याची विक्री करीत असताना की ज्यामुळे मानवी जिवन धोक्यात येईल किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत किंवा नुकसान पोहचण्याचा धोका संभवता येईल ईतक्या बेदरकारपणे हयगयीने सदर ज्वालाग्राही पदार्थामुळे मानवी जिवीतास पोहचणा-या संभावी धोक्यापासुन सुरक्षीत राहण्याइतपत पुरेसा साहित्य जवळ न ठेवता जाणीवपुर्वक हयगय केली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा विधाते ९९२२९३७३०३

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी ५४३/२०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२२/१०/२०२४ रोजी १५.४५ वा चे सुमारास मोशी टोल नाक्याजवळ शिवाजीवाडी चौकाच्या अलाकडे पुणे नाशिक रोडचे कडेला |
| गुन्हा दाखल | :- | दि.२२/१०/२०२४ रोजी १९.५५ वा |
| फिर्यादी | :- | हर्षद जयवंत कदम पोलीस शिपाई ३०३४ मालमत्ता गुन्हे विरोधी पथक गुन्हे शाखा |
| आरोपी | :- | मेघराज अजित यादव वय २३ वर्ष रा.कात्रज गावठाण कात्रज पुणे मुळगाव बझरवाडी ता.भोर जि.पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी यांने मा.पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांचे मनाई आदेश असताना, सदर आदेशाचा भंग करुन, कि.रू. १,४४,१००/- रू ची एक प्लॅटिना मोटार सायकलहिचेसह त्यांचे कब्ज्यात ०२ लोखंडी पिस्टल व ०४ जिवंत काडतुसे (राऊंड) बाळगण्याचा कोणताही कायदेशीर परवाना नसताना जवळ अवैधरित्या बाळगले असताना मिळुन आला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि पवार मालमत्ता विरोधी पथक गुन्हे शाखा ९९७५४९०११५ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी ४७५/२०२४ भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३(२५)व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) सह १३५, १४२ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२२/१०/२०२४ रोजी २०.३५ वा. चे सुमा.ट्रान्सपोर्टनगर संरक्षण भिंतीलगत व्हीआरसी कंपनीजवळ ट्रान्सपोर्टनगर निगडी |
| गुन्हा दाखल | :- | दि.२३/१०/२०२४ रोजी ००.५० वा. |
| फिर्यादी | :- | अजित आण्णा सानप पोकॉ ब.नं. १९२० गुन्हे शाखा, युनिट २, पिंपरी-चिंचवड |
| आरोपी | :- | सुरज उर्फ ति-या दत्ता मोरे वय- २२ वर्षे रा. घर नं. जे/११/१६, बौध्दनगर, काळभोर गोठा, ओटास्किम, निगडी, पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद तडीपार आरोपी यास मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ- ०१, पिंपरी-चिंचवड यांचे तडीपार आदेशान्वये दिनांक ०१/०६/२०२३ रोजी पासुन पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्द, पुणे शहर पोलीस आयुक्तालय हद्द व पुणे ग्रामीण पोलीस हद्दीतुन दोन वर्षाकरीता तडीपार केले असतांना त्याने कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता तडीपार आदेशाचा भंग करून व त्याचे कब्जामध्ये ०१ देशी बनावटीचे पिस्टल व ०२ जिवंत काडतुस असे ५१०००/- रुपये किंमतीचे अग्नीशस्त्रे व जिवंत काडतुस विनापरवाना बेकायदेशीररित्या अनाधिकारने जवळ बाळगुन मा. पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिंचवड यांचा मनाई आदेशाचा भंग करुन मिळुन आला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि सातपुते ९६५७६४२५७४ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | भोसरी (दापोडी) ६५६/२०२४ भा.न्या.सं.कलम१०८ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२१/१०/२०२४ रोजी १३/०० ते १५/०० वा. दरम्यान दापोडी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२२/१०/२०२४ रोजी ०६.२७ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी वय ६७ वर्षे धंदा-घरकाम रा दापोडी पुणे -१२, |
| आरोपी | :- | अश्विन सुधीर गायकवाड वय २० वर्षे धंदा-शिक्षण रा.जयभिमनगर दापोडी पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी यांचे जाचास व त्रासास कंटाळून फिर्यादीची मयत मुलगी वय २१ वर्षे रा. दापोडी पुणे -१२, हीने आपले राहते घरी गळफास लावून घेवून आत्महत्या केली आहे म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि कोबळे ९७६५३९३८४९ |

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण ७४२/२०२४ भा.न्या.सं.कलम १०८,११५(२),३५१(२).३५२

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१२/०७/२०२४ रोजी २०/२० वा.चे सुमारास बिरदवडी ता. खेड जि. पुणे .येथे चाकण

गुन्हा दाखल :- दि.२२/१०/२०२४ रोजी १२/१८ वा.

फिर्यादी :- पुष्पेंद्र गुलाबसिंग रघुवंशी वय ५२ वर्षे धंदा- शेती रा. ग्रारिवाज, पोस्ट लटागाव ,मैहयात ,जि.मैयर ,मध्यप्रदेश

आरोपी :- १)धर्मराजसिंग रघुवंशी २)सत्येंद्रसिंग रघुवंशी दोघे राहणार रा. ग्रारिवाज, पोस्ट लटागाव ,मैहयात ,जि.मैयर ,मध्यप्रदेश राज्य **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचा मयत मुलगा अकलेंद्र पुष्पेद्र रघुवंशी वय २५ वर्षे यांनी फिर्यादी यांना फोन करुन सांगीतले की, मी आरोपी क्र १ यांचेकडे १,५७,०००/- रु व आरोपी क्र २ यांचेकडे २६,८१६/-रु मागीतल्यावर नमुद आरोपीहे मला हाताने मारहान करतात मला दमदाटी शिवीगाळी करतात असे सांगीतले होते.फिर्यादी यांचे मयत मुलगा याने राहते घराचा दरवाजा आतिल कडी लावुन बंद करुन घरातील फॅनच्या हुकाला पंच्या बांधुन पायाखालील गॅस सिलेंडरची टाकी घेवुन त्यावर चढुन गळफास लावुन घेतला त्यास घरमालक विजय तुकाराम चव्हाण यांनी पोलीस व आरोपी १ व २ यांनी दरवाजाची कडी तोडुन ग्रामिण रुग्णालय चाकण येथे आले असता डॉक्टरांनी मयत झाल्याचे घोषीत केले आहे. फिर्यादी यांचा मयत मुलगा यास आरोपी १ यांचेकडे दिलेले पैसे १,५७,०००/ रु मागीतले व आरोपी २ यांचेकडे २६,८१६/ रु मागीतले त्या कारणावरुन फिर्यादी यांचे मयत मुलास नमुद आरोपी यांनी हाताने मारहान शिवीगाळी ,दमदाटी करुन आत्महत्या करणेस प्रवृत्त केले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि मोरखंडे ९९२१११८१००

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- महाळुंगे एमआयडीसी ७१५/२०२४ भा.न्या.सं.कलम ११८(१),११५,३५२,३(५)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२२/१०/२०२४ रोजी १३.३० वा.चे सुमा.मौजे कुरुळी गावचे हद्दीत, मु-हेवस्ती ता. खेड जि.पुणे फिर्यादीचे राहते घरासमोर

गुन्हा दाखल :- दि.२२/१०/२०२४ रोजी २२.२८ वा.

फिर्यादी :- महिला फिर्यादी वय ४५ वर्ष, धंदा - शेती, रा. कुरुळी, मु-हेवस्ती, अजिंक्य हॉटेलच्या समोर ता. खेड जि.पुणे,

आरोपी :- १)अनिल सोनवणे, २)सागर सोनवणे, ३)महिला आरोपी , ४)महिला आरोपी सर्व रा. कुरुळी ता.खेड जि.पुणे **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादीचे रुममध्ये राहणारे भाडेकरुची मुलगी हीचे कडे ०९.०० वा.चे सुमा. फिर्यादीचे घरासमोरील आरोपी क्र १ यांचे रुममध्ये राहणारा भाडेकरु अजय कोळी हा वाईट नजरेने पाहत होता त्या बाबत मुलगी हीने त्याला जाब विचारल्याचे कारणा वरुन फिर्यादी व मुलगा अक्षय असे राहते घरासमोर आले त्यावेळी आरोपी क्र ४ व ३ यांनी फिर्यादी बरोबर वाद घालुन मुलगा अक्षय हा वाद सोडवित असताना आरोपी क्र १ याने फिर्यादीला व मुलगा अक्षय यास लाकडाचे चुका असलेल्या फळीने हातावर मारहाण करुन तसेच आरोपी क्र २ याने कानाखाली मारुन, दुखापत केली तसेच मुलगा अक्षय याला आरोपी क्र २ याने फळीने व विटेचे तुकडयाने मारहाण करुन दुखापत केली म्हणुन व सदर भांडणात फिर्यादीचे गळयातील दिड तोळयाची सोन्याची पोत तुटल्याने गहाळ झाली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा जायभाये ८२०८९९०५६०

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी १२०१/२०२४ भा.न्या.संहिता ३२५ सह कलम प्राण्यानां क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९६० चे कलम ११ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०५.१०.२०२४ रोजी ०३.०० वा ते दि.१८.१०.२०२४ रोजीचे १३.०० वा दरम्यान ॲनिमल वेलफेअर ट्रस्टचे फाउंडर नेरे दत्तवाडी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२२/१०/२०२४ रोजी २३.५० वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी वय ३२ वर्षे धंदा नोकरी रा. गहुंजे, रावेत, पुणे |
| आरोपी | :- | रोहित चौधरी ॲनिमल वेलफेअर ट्रस्टचे फाउंडर नेरे दत्तवाडी पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी नमुद आरोपी यांचे कडे १२,०००/- रुपये देवुन कुत्री संभाळण्याकरीता दिली होती.फिर्यादी यांनी कुत्र्याचे फोटो व फॅनचे फोटो पाठवण्यास सांगीतले असता आरोपी याने टाळाटाळ केली काही दिवसानंतर फोन बंद केले.फिर्यादी हयांनी कुत्र्याचे फोटोचे पॉम्पलेट लावुन कुत्र्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असता आरोपीचे शेल्टरजवळील एका इसमाने शेल्टर पासुन २०० मी अंतरावर मयत कुत्री दाखवली. आरोपी याने संभाळण्यास दिलेली कुत्रीचा संभाळ न करता तिस डांबुन ठेवुन मारुन टाकले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि झोल ८२७५३८७४७७ |

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली ६२७/२०२४ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२१/१०/२०२४ रोजी १७/१५ वा. चे. सुमारास मोहन लोंढे यांचे घराचे पाठामागे लोखंडे रस्ता पाटीलनगर चिखली,पुणे येथील मोकळ्या जागेत घडला असे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.२२/१०/२०२४ रोजी ००.५४ वा. |
| फिर्यादी | :- | प्रदिप चंद्रकांत पोटे, पो.हवा..ब.क्र.८०१, नेमणुक खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड. |
| आरोपी | :- | दशरथ सिताराम कसबे वय-४७ वर्षे रा.पांडुरंग नेवाळे यांची खोली,नेवाळे वस्ती,पाटील नगर,चिखली पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी याने आपले कब्ज्यात एकुण किंमत ६,०००/-रु.किं.ची ६० लिटर गावठी हातभट्टीची तयार दारू अनाधिकाराने, विनापरवाना, बेकायदेशीररित्या विक्री करीता जवळ बाळगला असताना मिळुन आला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोना साबळे ८१४९५२४१४६ |